सं.फौ.प्र.क्र.३९७/२०२३

<u>निशाणी क्रमांक १ खाली</u>

<u>साक्षीदाराचे सत्यापण (**Verification**)</u>

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

माझे नांव :– पंचफुला कारभारी गायकवाड,

वय सुमारे :– ७२ वर्षे, व्यवसाय – घरकाम व शेती,

निवासस्थान :– दरेगांव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद,

फिर्यादी हा माझा मुलगा आहे. घटना दिनांक १९/१२/२०२३ रोजी रात्री ९.३० वा.चे सुमारास मौजे दरेगांव येथील गट क्र.२८७ मध्ये घडली. त्याच्या आगोदर दिनांक १८/१२/२०२३ रोजी आम्ही आमच्या शेतामधील घरात बसलेलो असतांना आरोपी रायभान शंकर गायकवाड हा आमच्या घराजवळ आला व आम्हाला जोर जोराने शिवीगाळ करु लागला. त्यानंतर माझा मुलगा बऱ्याचवेळा आरोपीला समाजावुन सांगत होतो. परंतु आरोपी त्याची शिवीगाळ करने थांबवत नव्हता. त्यांनतर रायभान हा त्याच्या घरी गेला व घरातुन कुऱ्हाड घेवुन आला व माझ्या मुलावर जिवे मारण्याच्या उद्दशाने त्याच्या अंगावर धावुन आला व त्याला कुऱ्हाडीने मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी माझ्या मुलगा सदर घटनेबद्दल बाजार सांवगी पोलीस चौकी येथे तक्रार देण्यासाठी गेला असता तेथील पोलीसांनी त्याला खुलताबाद पो.स्टे.ला जाऊन तक्रार देण्याचे सांगितले. त्यामुळे माझ्या मुलाने आरोपीविरुद्ध खुलताबाद पोलीस तक्रार दिली. परंतु पोलीसांनी काहीएक कार्यवाही केली नाही. आम्हाला न्याय मिळावा म्हणुन मी आज रोजी न्यायालयात जबाब देण्यासाठी आले आहे. या व्यतीरीक्त मला काहीएक सांगायचे नाही.

स्वाक्षरीत/–
फिर्यादीची स्वाक्षरी/अंगठा

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–
(डॉ. एस.व्ही.राजकुंटवार)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खुलताबाद

दिनांकः– २१/०३/२०२४